दैनिक

चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी



❊ वर्ष : ०१ ले ❊ | ❊ अंक : १०४ ❊ | ❊ सोमवार १६ नोव्हेंबर २०२६ ❊ | ❊ जालना ❊ | ❊किंमत : २ रूपये ❊ | ❊पृष्ठे : ४ ❊

◎Volume 01◎ | ◎ Issue 104 ◎ | ◎ Monday, Date : 16 November 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎Price Rs. 2 ◎ | ◎Pages 4 ◎

शेतकऱ्यांनो, ई-केवायसी आणि फार्मर आयडी तातडीने पूर्ण करा! सरकारी मदत मिळवण्यासाठी महत्त्वाचे आवाहन

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कृषी योजनांसह अन्य शासकीय योजनांचा लाभ थेट मिळावा, यासाठी ई-केवायसी आणि फार्मर आयडी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. विशेषतः दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाने केले आहे. ग्रीस्टॅक प्रणालीतील शेतकऱ्यांची माहिती अद्ययावत असल्यास शासकीय योजनांचे लाभ वेळेत मिळण्यास मदत होणार आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी ई-केवायसी महत्त्वाची

राज्य सरकारकडून विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक मदत, अनुदान आणि इतर लाभ दिले जातात. नैसर्गिक आपत्ती आणि अन्य संकटांच्या काळातही शासनाकडून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. सध्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी आणि फार्मर आयडीचे महत्त्व वाढले आहे. पात्र शेतकऱ्यांना मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक नोंदणी आणि पडताळणी प्रक्रिया पूर्ण असणे गरजेचे आहे. ग्रीस्टॅक प्रणालीत माहिती अद्ययावत असणे आवश्यक

ग्रीस्टॅक प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती एकत्रित केली जात आहे. ही माहिती अद्ययावत असल्यास कृषी



विभागासह अन्य विभागांच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे सोपे होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ई-केवायसी आणि फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. यामुळे योजनांचा लाभ मिळवताना येणाऱ्या अडचणी कमी होण्यास मदत होईल, असे मदत व पुनर्वसन विभागाने स्पष्ट केले आहे. तांत्रिक अडचणी आल्यास शासनाकडून सहकार्य

ई-केवायसी किंवा फार्मर आयडी तयार करताना काही तांत्रिक अथवा अन्य अडचणी येत असल्यास संबंधित शासकीय यंत्रणांकडून आवश्यक सहकार्य केले जाईल. कोणत्याही अडचणीमुळे प्रक्रिया अपूर्ण ठेवू नये. संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून माहिती अद्ययावत करावी आणि आवश्यक पडताळणी पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

फार्मर आयडी कुठे आणि कसा तयार कराल?

शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करण्यासाठी जवळच्या सीएससी (नागरी सुविधा केंद्र) येथे भेट द्यावी. यासाठी आधार कार्ड आणि आधारशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक सोबत घेऊन जावा. तेथे आवश्यक नोंदणी आणि पडताळणी प्रक्रिया पूर्ण करून फार्मर आयडी तयार करून घेता येईल. शासकीय योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचविण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची असल्याने राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी ई-केवायसी आणि फार्मर आयडीला प्राधान्य देऊन तातडीने पूर्ण करावे, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाने केले आहे.

युवक हे समाजाच्या परिवर्तनाचे खरे शिल्पकार ; भाजपमध्ये प्रवेश युवकांचा अभिमानास्पद : राहुल लोणीकर

आकाश काळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस मधून भाजपमध्ये अनेक युवकांचा प्रवेश



परतूर/प्रतिनिधी : युवक हे समाजाच्या परिवर्तनाचे खरे शिल्पकार असून त्यांच्या ऊर्जा, कल्पकता आणि कार्यक्षमतेला योग्य दिशा मिळाल्यास विकासाची नवी पर्वणी निर्माण होते. परतूर शहरातील युवकांचा भारतीय जनता पक्षाकडे वाढता ओढा आणि पक्षावरील त्यांचा विश्वास ही संघटनेसाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी केले. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचेआमदार बबनराव लोणीकर स आणि राहुल भैया लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत परतूर शहरातील अनेक युवकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी बोलताना राहुल भ लोणीकर यांनी नव्याने पक्षात प्रवेश केलेल्या युवकांचे स्वागत केले. युवकांमध्ये प्रचंड ऊर्जा, कल्पकता आणि कार्यक्षमता असून समाजाच्या विकासात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. युवकांनी राजकारण आणि समाजकारणात सक्रिय सहभाग घेतल्यास विकासाच्या प्रक्रियेला अधिक गती मिळू शकते. भारतीय जनता पक्षाने नेहमीच युवकांना संधी देत त्यांच्या नेतृत्वगुणांना वाव देण्याचे काम केले आहे, असे त्यांनी नमूद केले. आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामांची वाटचाल सुरू आहे. जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासाभिमुख राजकारणाला चालना दिली जात आहे. या नेतृत्वावर विश्वास ठेवून युवकांनी भाजपमध्ये प्रवेश करणे ही पक्ष (पान ३ वर)

बालहक्क सप्ताहाला उत्साहात सुरुवात; मुलांना मिळणार विविध उपक्रमांची मेजवानी

परतूर प्रतिनिधी : बालकांचे हक्क, संरक्षण, शिक्षण आणि सुरक्षित बालपण याबाबत समाजात जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, वाटूर, तालुका बाल संरक्षण समिती व ग्राम बाल संरक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत बालहक्क सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या सप्ताहाला उत्साहात सुरुवात झाली आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बालकांना आपल्या अपेक्षा, समस्या आणि स्वप्ने मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये 'माझे गाव, माझ्या अपेक्षा', ऊसतोड



समाजातील प्रत्येक बालकाला सन्मानाने जगण्याचा, शिक्षणाचा, संरक्षणाचा आणि आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. गावातील मुलांच्या विविध समस्यांवर गावागावांत संवाद साधला जात असून हंगामी स्थलांतरित कुटुंबांना भेटी देऊन त्यांच्या मुलांच्या प्रश्नांचा आढावा घेतला जात आहे. स्थलांतरामुळे गावात मागे राहिलेल्या बालकांसाठी समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येत आहे. बालहक्क सप्ताहाच्या निमित्ताने मुलांना मुक्त व्यासपीठ, भिंत नसलेली शाळा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धांची मेजवानी मिळणार आहे. बालकांचे प्रश्न केवळ सप्ताहापुरते मर्यादित न राहता त्यांचे संरक्षण ही गावाची सामूहिक जबाबदारी बनली पाहिजे,

एकनाथ राउत
अध्यक्ष आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था

कामगारांच्या मुलांसाठी स्पर्धा, आत्मकथन, चित्रकला स्पर्धा तसेच गावातील बालकांच्या विविध समस्यांचे (पान ३ वर)

दिव्यांगांच्या मानधनात सहा हजार रूपये वाढ करा : आ. शिरसाट



जालना । प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्यातील दिव्यांग बांधवांना मिळणारे मासिक आर्थिक सहाय्य महागाईच्या तुलनेत अपुरे पडत असल्याने दिव्यांगांचे मासिक पेन्शन ५ हजार रुपयांवरून ६ हजार रुपये करण्यात यावे, अशी लेखी मागणी आमदार सुहास पार्वती त्रिंबकराव शिरसाट यांनी राज्याचे दिव्यांग सक्षमीकरण मंत्री अतुल सावे यांच्याकडे केली आहे. दिव्यांगांच्या सहा हजार रुपये पेन्शनच्या मागणीला त्यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर दिव्यांगांना मासिक सहा हजार रुपये पेन्शन मिळावे, या प्रमुख मागणीसाठी धरणे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनातून दिव्यांगांच्या आर्थिक प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात (पान ३ वर)

खाजगी कापूस खरेदीचा शुभारंभ संपन्न!



जालना (प्रतिनिधी) : गुंडेवाडी राजूर रोड,जालना येथील 'ओमेश कॉर्टेक्स जिनिंग प्रेसिंग' च्या वतीने खाजगी कापूस खरेदीचा शुभारंभ मंगळवार,दिनांक १० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता उत्साहात संपन्न झाला.परिसरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हक्काचे व सोयीचे खरेदी केंद्र उपलब्ध व्हावे,या उद्देशाने या खाजगी कापूस खरेदीचा शुभारंभ करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार अर्जुनराव खोतकर आमदार नारायणराव कुचे ,मा. आ. अरविंदराव चव्हाण श्री.भास्करराव आंबेकर ,नगराध्यक्ष,जालना),मा. श्री.भास्कर (आबा) दानवे (जिल्हाध्यक्ष भाजपा,जालना),मा. श्री.परमेश्वर वरखरडे (सहाय्यक निबंधक व प्रशासक कृ.उ.बा.समीती,जालना) आणि मा.श्री.भरत संपतराव तनपुरे (सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती,जालना), अजय मिरकड, अशोक कोल्हे, शिवानंद पालवे,संजय जाधव, (पान ३ वर)

पंडित जवाहरलाल नेहरू यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

जालना/प्रतिनिधी : स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. नायब तहसीलदार किशोर तायडे, महसूल सहायक राहुल खंदारे, महसूल सहायक सविता भोकरे, सुनिल काळुंके यांच्यासह उपस्थित



अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याचे भव्य अनावरण करण्यात येईल : उपमहापौर राजेश राऊत



जालना/प्रतिनिधी : बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती विठ्ठल मंदिर विठ्ठल मंदिर कसबा येथे साजरी करण्यात आली, अध्यक्ष स्थानावरून बोलताना राजेश राऊत उपमहापौर जालना महानगरपालिका यांनी असे सांगितले की बिरसा मुंडा यांच्या विचाराने देशात क्रांती होऊ शकते, त्यामुळे संपूर्ण आदिवासी समाजाने संघटित होण्याची काळाची गरज आहे, लवकरच जालना शहरातील एका नामांकित चौकाला बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात येऊन त्या ठिकाणी बिरसा मुंडा यांचा भव्य असा पुतळा उभा करण्यात येईल , सदरील कार्यक्रमाचे आयोजन आदिवासी समाज विकास मंच यांच्या वतीने घेण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. विजय कुमठेकर म्हणाले की, ब्रिटिश काळापासून ते आजपर्यंत आदिवासी समाज हा संघटित कधी होऊ शकला नाही, देशपातळीवर हा समाज फार मोठ्या प्रमाणात असून या समाजामध्ये शिक्षण येणे ही काळाची गरज आहे. केवळ कायदे करून हा समाज संघटित होणार नाही तर या समाजाला संघटित करण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे माणसांना पदवी मिळते पदवी प्राप्त केलेल्या माणसाने समाज बदलविण्यासाठी आणि समाजाला एकत्र करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, ब्रिटिश काळामध्ये कोणाची साथ नसताना बिरसा मुंडा यांनी उलगुलान केले होते, आज विकासाच्या नावाखाली या देशातील संपूर्ण आदिवासींना बेघर करण्यासाठी, षड्यंत्र सुरू आहेत. विकास हा केवळ दीन,दलित, शोषित, आदिवासी यांच्यावरच अवलंबून असतो का? देशाच्या सर्वोच्च पदावर एक आदिवासी महिला बसलेली असताना सुद्धा तिचा अवमान कशा पद्धतीने केला जातो हे आजही आपण पाहतो, संसदेच्या भूमिपूजन प्रसंगी उद्घाटन प्रसंगी तिला बोलावले जात नाही, राम (पान ३ वर)

भगवान बिरसा मुंडा यांचे शौर्य, त्याग आणि क्रांतिकारी विचार सदैव प्रेरणादायी : आ. बबनराव लोणीकर

बिरसा मुंडा यांच्या कार्यक्रमादरम्यान अनेक महिला पुरुषांचा आमदार बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीमध्ये भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश



परतूर/प्रतिनिधी : आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांचे कार्य भारतीय इतिहासात अत्यंत गौरवशाली असून त्यांचे शौर्य, त्याग आणि क्रांतिकारी विचार आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. परतूर येथे क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त तसेच जनजातीय गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार बबनराव लोणीकर आणि जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल भैया लोणीकर यांनी उपस्थित राहून भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व विनम्र अभिवादन केले. यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या संघर्षमय जीवनकार्याचा गौरव केला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही भगवान बिरसा मुंडा यांनी अन्याय, शोषण आणि ब्रिटिश सत्तेविरोधात संघर्ष उभारला. आदिवासी समाजामध्ये स्वाभिमान, एकजूट आणि आपल्या हक्कांविषयी जागृती निर्माण करण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. समाजाच्या अस्मितेसाठी आणि अस्तित्वासाठी त्यांनी दिलेला लढा भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण अध्याय असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. याप्रसंगी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल भैया लोणीकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. भगवान बिरसा मुंडा यांच्या महान कार्याचे स्मरण करत त्यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि न्यायासाठी भगवान बिरसा मुंडा यांनी केलेल्या संघर्षाला अभिवादन केले. त्यांचे विचार, त्याग आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी आजच्या पिढीला निश्चितच प्रेरणा देणारी असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतातून नमूद केले.

या कार्यक्रमाच्या वेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून नायगाव येथील कानिफनाथ स्वयं संस्था महिला बचत गटातील दत्ता मारुती ढवरे, उषा मारुती दुबळकर, द्वारका सुधाकर दुबळकर, नारायण दुबळकर, सागर दत्ता ढवरे, ज्ञानेश्वर दुबळकर, पार्वती महादेव दुबळकर, सत्यभामा पंढरीनाथ दुबळकर, सुमित्रा परमेश्वर दुबळकर, कौसाबाई कंठीराम दुबळकर, कौसाबाई आसाराम दुबळकर, जिलबाबाई विठ्ठल काळे, बन्सी शामराव काळे, संतोष लक्ष्मण काळे, मच्छिंद्र रामभाऊ काळे, रवि कठाळू पवार, गंगुबाई बन्सी काळे, किरण सरुलाल काळे, मीराबाई रवि पवार, मिठाबाई शामराव काळे, आशाबाई कुंडलिक काळे, शामाबाई तुकाराम चव्हाण, चिवळी धपुलाल चव्हाण, सोनाबाई कुंडलिक काळे, दीपा दराजी चव्हाण आदींचा समावेश आहे. नायगाव : शबरी माता महिला बचत गटातील कमल रतन डवरे, संजीवनी मारुती फुफाटे, मीरा आसाराम फुफाटे, सुनीता लक्ष्मण फुफाटे, सौमिला प्रल्हाद फुफाटे, शांताबाई श्रीराम डावरे, भागुबाई जनार्दन फुफाटे, संगीता रोहिदास कोकाटे, चंद्रकला राघोजी घोगरे, पुनम संदीप उपाटे तर ढगी, ता. जालना : आशामती मुकिंदा साबळे, राधा संतोष कोकाटे, शोभा शिवाजी कोकाटे, नंदा शिवाजी साबळे, सुनीता अशोक साबळे, गयाबाई सुखदेव व्यवहारे, (पान ३ वर)

संपादकीय

वंदे भारत एक्सप्रेसचा धक्कादायक प्रकार

वंदे भारत एक्सप्रेसबाबत सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रकार समोर आला आहे. डब्यांचे ब्रेक प्रभावीपणे काम करत नसतानाही ही ट्रेन तब्बल ४६३ किलोमीटर धावली. लोको पायलटने वारंवार तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणाची दक्षिण पूर्व रेल्वेने चौकशी सुरू केली आहे.

देशातील आधुनिक आणि वेगवान रेल्वे सेवांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसबाबत सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रकार समोर आला आहे. झारखंडमधील हटिया येथून उत्तर प्रदेशातील झाशीच्या दिशेने जाणारी रिकामी वंदे भारत ट्रेन तब्बल ४६३ किलोमीटरचा प्रवास डब्यांचे ब्रेक प्रभावीपणे काम करत नसतानाही करत राहिली. विशेष म्हणजे, ट्रेनमधील ब्रेकमध्ये बिघाड असल्याची माहिती लोको पायलटने संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना दिली होती. मात्र, त्यानंतरही ट्रेनचा प्रवास सुरू ठेवण्यात आला. या प्रकाराची गंभीर दखल घेत दक्षिण पूर्व रेल्वेने चौकशीचे आदेश दिले आहेत.

नेमकी घटना काय घडली? ही घटना २४ ऑक्टोबर रोजी घडली आहे. झारखंडमधील हटिया येथून वंदे भारतची रिकामी चेअर कार रेक उत्तर प्रदेशातील झाशी येथे हलवण्यात येत होती. यासाठी मालगाडीच्या इंजिनाचा वापर करण्यात आला होता. नियमानुसार, मालगाडीच्या इंजिनाची ब्रेकिंग यंत्रणा आणि वंदे भारतच्या डब्यांची ब्रेकिंग यंत्रणा एकमेकांशी योग्य प्रकारे जोडणे आवश्यक होते. मात्र, ही प्रक्रिया योग्य प्रकारे पूर्ण करण्यात आली नसल्याचा संशय आहे. लोको पायलटने दिली होती तक्रार हटिया येथून ट्रेन रवाना झाल्यानंतर लोको पायलटने ब्रेकची तपासणी केली. त्यावेळी ट्रेनची ब्रेकिंग क्षमता अत्यंत कमी असल्याचे त्याच्या लक्षात आले. रांची स्थानकावर पोहोचल्यानंतर त्याने सेक्शन कंट्रोलर आणि ट्रॅक्शन लोको कंट्रोलर यांच्याकडे ब्रेक व्यवस्थित काम करत नसल्याची लेखी तक्रार केली. मात्र, या तक्रारीनंतरही ट्रेनला पुढच्या प्रवासासाठी परवानगी देण्यात आली. यानंतर मुरी स्थानकावर दुसऱ्या लोको पायलटने ट्रेनची जबाबदारी स्वीकारली. त्यानेही ब्रेकमध्ये बिघाड असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना दिली आहे. विशेष म्हणजे, ब्रेक पाइपमधील दाब कमी करूनही डब्यांचे ब्रेक लागत नसल्याचे त्याने स्पष्ट केले आहे. तरीदेखील ट्रेनचा प्रवास सुरूच राहिला. ४६३ किलोमीटरचा प्रवास कसा झाला? उत्तर प्रदेशातील चंदौली जिल्ह्यातील दीनदयाळ उपाध्याय (ऊ्ग) स्थानकावर ट्रेन पोहोचल्यानंतर तिची तपासणी करण्यात आली. त्यावेळी सर्व डब्यांची ब्रेकिंग यंत्रणा आयसोलेट म्हणजेच मुख्य ब्रेकिंग यंत्रणेपासून वेगळी असल्याचे आढळले. त्यामुळे डब्यांचे ब्रेक कार्यरत नव्हते. परिणामी, या ट्रेनने सुमारे ४६३ किलोमीटरचा प्रवास केवळ मालगाडीच्या इंजिनचे ब्रेक आणि रीजेनरेटिव्ह ब्रेकिंग यंत्रणेच्या मदतीने पूर्ण केला. डब्यांच्या ब्रेकिंग यंत्रणेचा प्रभावी वापर झालाच नव्हता. सुदैवाने या प्रवासादरम्यान कोणतीही दुर्घटना घडली नाही. रेल्वे प्रशासनाकडून चौकशीचे आदेश या प्रकारानंतर दक्षिण पूर्व रेल्वेने ७ नोव्हेंबर रोजी चौकशीचे आदेश जारी केले. रांची विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना (उ्च्) या संपूर्ण घटनेची सविस्तर चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्राथमिक तपासात कोच आणि वॅगन विभागातील कर्मचारी, सेक्शन कंट्रोलर, ट्रॅक्शन कंट्रोलर तसेच ट्रेन चालवणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील चुका समोर आल्या आहेत. ट्रेन रवाना करण्यापूर्वी डब्यांचे ब्रेक प्रत्यक्ष तपासण्यात आले नव्हते. तसेच लोको पायलटच्या तक्रारीनंतरही योग्य ती कारवाई करण्यात आली नसल्याचे चौकशी आदेशात नमूद करण्यात आले आहे. आता या प्रकरणात नेमकी चूक कुणाची होती, ट्रेनला पुढच्या प्रवासाची परवानगी कशी देण्यात आली आणि सुरक्षा नियमांचे पालन का झाले नाही, याची सविस्तर चौकशी केली जाणार आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक सुधारात्मक उपाययोजना करण्याचे निर्देशही रेल्वे प्रशासनाने दिले आहेत.

सायबर सुरक्षेसाठी केंद्र सरकारचा पुढाकार

नवी दिल्ली: वाढत्या सायबर गुन्हेगारीला आळा घालणे, डिजिटल तपास यंत्रणा सक्षम करणे आणि देशाचे डिजिटल भविष्य अधिक सुरक्षित बनवण्याच्या उद्देशाने नवी दिल्लीत तिसऱ्या राष्ट्रीय सायबर सुरक्षा, डिजिटल न्यायवैद्यक आणि थ्रेट इंटेलिजन्स परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या (चशळींध) अंतर्गत कार्यरत राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान संस्था (छखएऽखढ) यांच्या वतीने १६ आणि १७ नोव्हेंबर २०२६ रोजी ही परिषद होणार आहे. 'सायबर सुरक्षित भारत : भारताच्या डिजिटल भविष्याला मजबूत करणे' ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे. नवी दिल्लीतील डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र, १५ जनपथ येथे ही परिषद पार पडणार आहे. सायबर सुरक्षेच्या बदलत्या आव्हानांवर विचारमंथन आजच्या काळात बँकिंग, शिक्षण, आरोग्य, उद्योग आणि सरकारी सेवांसह जवळपास प्रत्येक क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. त्याचबरोबर सायबर हल्ले, ऑनलाइन फसवणूक आणि डिजिटल गुन्ह्यांचे स्वरूपही अधिक गुंतागुंतीचे होत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा आणि डिजिटल तपास ही राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची क्षेत्रे बनली आहेत. या पार्श्वभूमीवर सायबर क्षेत्रातील उदयोन्मुख धोके, तांत्रिक प्रगती, तपासाची आधुनिक तंत्रे आणि नियामक बदल यांवर परिषदेत चर्चा होणार आहे. सुरक्षित आणि सक्षम डिजिटल परिसंस्था उभारण्यासाठी आवश्यक धोरणांवरही तज्ज्ञ विचारमंथन करणार आहेत. दहा महत्त्वाच्या विषयांवर चर्चा या दोन दिवसीय परिषदेत सायबर सुरक्षेशी संबंधित दहा प्रमुख विषयांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. त्यामध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल न्यायवैद्यक, कृत्रिम बुद्धिमत्तेची सुरक्षितता, महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचे संरक्षण, थ्रेट इंटेलिजन्स, ब्लॉकचेन आणि क्रिप्टो, ड्रोन आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (खेढ) फॉरेन्सिक्स, डिजिटल पुरावे, सायबर कायदा आणि क्लाउड सुरक्षा या विषयांचा समावेश आहे. तज्ज्ञ आणि व्यावसायिकांना एकत्र आणणारे व्यासपीठ सायबर सुरक्षा क्षेत्रातील तज्ज्ञ, डिजिटल न्यायवैद्यक व्यावसायिक आणि संबंधित क्षेत्रातील अभ्यासकांना एकत्र आणणे हा या परिषदेचा उद्देश आहे. डिजिटल गुन्ह्यांचा तपास अधिक प्रभावी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल पुराव्यांचे संरक्षण आणि सायबर धोक्यांना वेळीच ओळखण्याच्या उपायांवर या परिषदेत चर्चा होणार आहे. देशाच्या डिजिटल पायाभूत सुविधांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ज्ञान, अनुभव आणि धोरणात्मक दिशा मिळवून देण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची ठरणार आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी ई-केवायसी महत्त्वाची

राज्य सरकारकडून विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक मदत, अनुदान आणि इतर लाभ दिले जातात. नैसर्गिक आपत्ती आणि अन्य संकटांच्या काळातही शासनाकडून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. सध्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी आणि फार्मर आयडीचे महत्त्व वाढले आहे. पात्र शेतकऱ्यांना मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक नोंदणी आणि पडताळणी प्रक्रिया पूर्ण असणे गरजेचे आहे. ग्रीस्टॅक प्रणालीत माहिती अद्ययावत असणे आवश्यक ग्रीस्टॅक प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती एकत्रित केली जात आहे. ही माहिती अद्ययावत असल्यास कृषी विभागासह अन्य विभागांच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे सोपे होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ई-केवायसी आणि फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. यामुळे योजनांचा लाभ मिळवताना येणाऱ्या अडचणी कमी होण्यास मदत होईल, असे मदत व पुनर्वसन विभागाने स्पष्ट केले आहे.

गौतम गंभीरची ती पोस्ट चर्चेत



भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळल्या गेलेल्या अंडर-१९ आशिया कप २०२६ च्या (ण१९ ीलर ींी २०२६) अत्यंत रोमांचक आणि अटीतटीच्या अंतिम सामन्यात भारतीय युवा संघाने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. अंतिम सामन्यात पाकिस्तानचे ३३८ धावांचे अवाढव्य आव्हान भारताने एका विकेट राखून थरारक पद्धतीने पार केले आणि रेकॉर्ड-ब्रेक नववे आशिया कप विजेतेपद आपल्या नावावर केले. भारताच्या या विजयानंतर संपूर्ण क्रिकेट विश्वात आनंदाचे वातावरण असून, भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी केलेली एक सोशल मीडिया पोस्ट सध्या इंटरनेटवर तुफान व्हायरल होत आहे.

कठीण प्रसंगात भारताचा ऐतिहासिक विजय ३३८ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. ४२ व्या षटकात २५२ धावांवर भारताचे आठ फलंदाज तंबूत परतले होते आणि पाकिस्तानचा विजय निश्चित मानला जात होता. अशा अत्यंत दबावाच्या आणि कठीण प्रसंगात खालच्या फळीतील फलंदाज मनाल (४७ धावा) आणि मोहित उल्वा (४९ धावा नाबाद) यांनी जिद्दीने खेळत भारताला अविश्वसनीय विजय मिळवून दिला. मोहित उल्वा याने शेवटच्या चेंडूवर चौकार ठोकत सामना भारताच्या झोक्यात टाकला. गौतम गंभीरची खास पोस्ट चर्चेत भारताच्या या ऐतिहासिक विजयानंतर मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर स्वतःला रोखू शकले नाहीत. त्यांनी एक्स (ट्विटर) वर एक अत्यंत जोशपूर्ण पोस्ट शेअर केली, जी अल्पावधीतच सोशल मीडियावर व्हायरल झाली. गंभीर यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले, निडर क्रिकेट. अचल विश्वास. जिद्दीला कोणताच फलंदाजीचा क्रम नसतो !! आशियाचे चॅम्पियन! शाब्बास मुलांनो! गंभीर यांच्या या वक्तव्याने आणि युवा खेळाडूंच्या जिद्दीने देशभरातील क्रिकेटप्रेमींची मने जिंकली आहेत. आर्यवीर सेहगाव ठरला 'मॅन ऑफ द मॅच' या संपूर्ण स्पर्धेत आणि अंतिम सामन्यात माजी स्फोटक फलंदाज वीरेंद्र सेहवागचा मुलगा आर्यवीर सेहवाग याने चमकदार कामगिरी केली. त्याने फायनलमध्ये कर्णधार लक्ष्य रायचंदानी (८० धावा) सोबत मिळून अवघ्या १७.४ ओव्हरमध्ये ९५ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. या धडाकेबाज सुरुवातीमुळेच भारताच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करणे सोपे झाले. आर्यवीरने संपूर्ण स्पर्धेत ५ डावांत ९०.२५ च्या जबरदस्त सरासरीने एकूण ३६१ धावा फटकावल्या. उत्कृष्ट कामगिरीसाठी त्याला 'मॅन ऑफ द मॅच' घोषित करण्यात आले. सामना संपल्यानंतर बोलताना आर्यवीरने सांगितले की, ड्रेसिंग रूममध्ये खेळाडूंमध्ये पूर्ण आत्मविश्वास होता की खेळपट्टी फलंदाजीसाठी अतिशय उत्तम असल्यामुळे हे लक्ष्य सहज गाठता येईल. मोहित आणि मनाल यांनी शेवटी दाखवलेल्या संयमी खेळाचेही त्याने कौतुक केले.

हेमंत ढोमे पुन्हा घेऊन येणार मैत्रीचा भन्नाट प्रवास, प्रदर्शनाची तारीख ठरली



मराठी चित्रपटसृष्टीत गेल्या काही वर्षांत अनेक वेगवेगळ्या विषयांवरील चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले. मात्र, मैत्री, नातेसंबंध, महिला सक्षमीकरण आणि आयुष्यातील छोट्या-छोट्या आनंदांचा अनुभव देणाऱ्या 'झिम्मा' चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले. २०२१ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर २०२३ मध्ये आलेल्या 'झिम्मा २'नेही प्रेक्षकांचे मनोरंजन केले. आता या दोन्ही चित्रपटांच्या यशानंतर 'झिम्मा ३'ची चर्चा सुरू झाली आहे. हेमंत ढोमे पुन्हा दिग्दर्शनाच्या भूमिकेत 'झिम्मा ३'च्या माध्यमातून दिग्दर्शक हेमंत ढोमे पुन्हा एकदा प्रेक्षकांसाठी काहीतरी खास घेऊन येत आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि लेखन हेमंत ढोमे करणार आहेत. तर अभिनेत्री आणि निर्मात्या क्षिती जोग यांनी चित्रपटाच्या निर्मितीची जबाबदारी सांभाळली आहे. चित्रपटाची निर्मिती चित्रचित्र मंडळी या बॅनरअंतर्गत करण्यात येत असून, इरादा स्टुडिओजकडून हा चित्रपट सादर केला जाणार आहे. विशेष म्हणजे, 'झिम्मा'च्या आधीच्या दोन्ही भागांमुळे या फ्रँचायझीला मोठा चाहतावर्ग मिळाला आहे. त्यामुळे तिसऱ्या भागात नेमकी कोणती कथा पाहायला मिळणार, याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे सिद्धार्थ चांदेकरची महत्त्वाची भूमिका 'झिम्मा ३'मध्ये अभिनेता सिद्धार्थ चांदेकर महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. सध्या उपलब्ध माहितीनुसार, त्याचे नाव चित्रपटाच्या कलाकारांच्या यादीत समोर आले आहे. मात्र, इतर कलाकारांची संपूर्ण यादी अद्याप जाहीर झालेली नाही. निर्माते आगामी काळात चित्रपटातील इतर कलाकारांची नावे आणि त्यांच्या भूमिकांबाबत माहिती देणार असल्याचे सांगितले जात आहे.त्यामुळे पहिल्या दोन भागांतील कलाकार पुन्हा एकत्र दिसणार का, तसेच यावेळी नव्या चेहऱ्यांची एन्ट्री होणार का, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

मैत्री, प्रवास आणि स्वतःचा शोध पुन्हा अनुभवायला मिळणार?

'झिम्मा' ही केवळ मनोरंजन करणारी कथा नसून, वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्ती एकत्र आल्यावर निर्माण होणारे नातेसंबंध, मैत्री आणि आयुष्याकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन यांची गोष्ट आहे. पहिल्या भागात वेगवेगळ्या वयोगटांतील सात महिला लंडनच्या सहलीसाठी एकत्र येतात. या प्रवासात प्रत्येक जणीला स्वतःला नव्याने ओळखण्याची संधी मिळते. यानंतर 'झिम्मा २'मध्येही मैत्री आणि नात्यांमधील भावनिक गुंफण पाहायला मिळाली. आता तिसऱ्या भागातही प्रवास, मैत्री आणि आयुष्यातील अनपेक्षित आनंद यांचा अनुभव मिळणार असल्याचे चित्रपटाच्या उपलब्ध वर्णनातून समोर आले आहे. मात्र, 'झिम्मा ३'च्या संपूर्ण कथानकाबाबत निर्मात्यांनी अद्याप सविस्तर माहिती दिलेली नाही.

१ जानेवारी २०२७ रोजी चित्रपटगृहांत दाखल होणार 'झिम्मा ३' हा चित्रपट १ जानेवारी २०२७ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असल्याची माहिती ऑनलाइन चित्रपट लिस्टिंगमध्ये देण्यात आली आहे. त्यामुळे नववर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रेक्षकांना हा मराठी चित्रपट पाहण्याची संधी मिळणार आहे.

चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेमुळे नव्या वर्षातील मराठी सिनेमांच्या यादीत 'झिम्मा ३'ची विशेष चर्चा सुरू झाली आहे.

चाहत्यांना आता ट्रेलर आणि पोस्टरची प्रतीक्षा

चित्रपटाची घोषणा आणि प्रदर्शनाची तारीख समोर आल्यानंतर आता चाहत्यांना 'झिम्मा ३'च्या पहिल्या पोस्टरची, टीझरची आणि ट्रेलरची प्रतीक्षा आहे. चित्रपटातील कलाकारांची संपूर्ण यादी कधी जाहीर होणार, याबाबतही उत्सुकता आहे. हेमंत ढोमे आणि क्षिती जोग यांची यशस्वी जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांसाठी काय घेऊन येते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

'चित्रपताका- २०२६'च्या दुसऱ्या पर्वाचा दिमाखदार शुभारंभ!



मुंबई: सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित 'चित्रपताका २०२६' या महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या पर्वाचा उद्घाटन सोहळा रविवारी, १५ नोव्हेंबरला दिमाखात संपन्न झाला. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. 'बंधू' या सिनेमाचे प्रदर्शनाने रविवारपासून या चार दिवसीय महोत्सवाचा प्रारंभ झाला असून महोत्सवात ३३ सिनेमे आणि १५ हून अधिक संवादसत्रांची पर्वणी रसिकांना मिळणार आहे. प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलात १५ ते १८ नोव्हेंबर दरम्यान हा महोत्सव संपन्न होणार असून रविवारी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याला सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, प्रमुख पाहुण्या म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, महोत्सव संचालक पुरुषोत्तम बेर्डे, प्रभात चित्र मंडळाचे अध्यक्ष किरण शांताराम, उद्घाटकीय सिनेमा असलेल्या 'बंधू' चित्रपटातील कलाकार जितेंद्र जोशी, उपेंद्र लिमये यांच्यासह अलेक्झांडर माक्सुको (बेलारूस), फर्झाना अहमद चौधरी (बांगलादेश), पीअर स्टिवरलिंक (बेल्जिअम), कुईन जी (चीन), झिपोर झामा (दक्षिण आफ्रिका), दहलिया तबकोल (इजिप्त), वू थी टू (व्हिएतनाम), महम्मद कुर्निया वान (इंडोनेशिआ), मिस ऑड्रिना विलानोएवा बेसरल (मेक्सिको), मिस प्रियांका (श्रीलंका) आदी देशांचे दुतावास अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी चित्रपताका महोत्सवामागील शासनाची भूमिका मांडली. राज्य शासन चित्रपट क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असून विविध योजना, उपक्रमांच्या माध्यमातून चित्रपटकर्मींना प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न आहे. तसेच मराठी चित्रपटांनी सातत्याने अनवट विषय हाताळले, वेगळे प्रयोग केले आणि प्रतिकूल परिस्थितीतही दर्जेदार कलाकृतींची निर्मिती केली, ही अभिमानाची बाब असल्याचे सांगत त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीतील निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या जिद्दीचे विशेष कौतुक केले. कोविड काळात निर्माण झालेल्या चित्रपटांना राज्य शासनाने विशेष अनुदान देऊन प्रोत्साहन दिल्याचाही त्यांनी उल्लेख केला. याप्रसंगी 'चित्रपताका'च्या यंदाच्या पर्वाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर करून त्यांनी 'चित्रपताका' महोत्सव आगामी काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक व्यापक स्वरूपात पोहोचावा, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही दिली. राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावरील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपटांची निर्मिती राज्य शासनाकडून केली जाते. त्याच धर्तीवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करून उत्तम चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या कलाकार आणि तंत्रज्ञांच्या कलाकृतींनाही प्रोत्साहन देण्याचा शासनाचा विचार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच सांस्कृतिक संवादाच्या दृष्टीने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र व देशाच्या कला-संस्कृती-परंपरेची ओळख दृढ करण्यासाठी मराठी सिनेमा महत्त्वपूर्ण भूमिका निभावू शकतो. त्यादृष्टीने याप्रसंगी उपस्थित विविध देशांतील दूतावास अधिकाऱ्यांना त्यांनी मराठी सिनेमाला त्यांच्या देशात अवकाश उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन केले. मराठी चित्रपटांना प्रदर्शनासाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पुढील तीन वर्षांत बेस्टच्या वाणिज्य विकासासाठी उपलब्ध जागांचा उपयोग मराठी सिनेमांसाठी विशेष चित्रपटगृहे उभारण्याचा शासनाचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले. त्याचबरोबर बालचित्रपटांची दर्जेदार निर्मिती आणि त्यांचे योग्य वितरण व प्रदर्शन यासाठी विशेष योजनांची आवश्यकता अधोरेखित करत येत्या काळात सांस्कृतिक कार्य विभाग आणि महामंडळाकडून पुढाकार घेतला जाईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी याप्रसंगी दिली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या संवेदनशील व विचारी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात दिवंगत अभिनेते नाना पाटेकर आणि ज्येष्ठ अभिनेत्री मधु कांबीकर यांच्या योगदानाचे स्मरण केले. चित्रपट महोत्सवांनी आपल्या कलात्मक जडणघडणीत बजावलेल्या भूमिकेचा उल्लेख करत समीक्षकांनी केलेले कौतुक, दिलेले प्रोत्साहन आणि त्यातून मिळालेली कलात्मक ऊर्जा यामुळे कलाकार म्हणून आपली वाटचाल समृद्ध झाल्याची भावना त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करत मराठी चित्रपटांच्या आशयवैभवाला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने 'चित्रपताका'सारखे महोत्सव महत्त्वपूर्ण ठरतील, असा विश्वास व्यक्त केला. तर यावेळी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक मनोगत व्यक्त केले. यावेळी त्या म्हणाल्या की, चित्रपट हे विविध भाषा, संस्कृती आणि समाजांना जोडणारे प्रभावी माध्यम आहे. आशयघनता आणि नवनवीन प्रयोग ही मराठी चित्रपटांची महत्त्वाची वैशिष्ट्ये असून, त्यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा महोत्सवाचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. यंदाच्या पर्वात ३३ चित्रपटांचे प्रदर्शन होणार असून, 'बुक टु स्क्रीन' हा साहित्य व चित्रपट क्षेत्र यांच्यातील दुवा सांधणाऱ्या उपक्रमासोबत १५ हून अधिक संवादसत्रे महोत्सवात होणार आहेत. महोत्सवासाठी नोंदणी शुल्कातून जमा होणारी संपूर्ण रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्यात येणार असल्याचेही व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. महोत्सवाचे संचालक पुरुषोत्तम बेर्डे यांनी प्रादेशिक भाषेतील चित्रपटांसाठी भव्य आणि एकभाषिक चित्रपट महोत्सव असण्याची गरज व्यक्त केली. त्यादृष्टीने 'चित्रपताका'चे महत्त्व अधोरेखित करत आशयघन, प्रयोगशील आणि नवोदितांच्या मराठी चित्रपटांना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न यंदाच्या पर्वात केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त चित्रनगरीच्या कार्याची आणि सुविधांची माहिती देणाऱ्या 'चित्रदर्शन' या माहितीपुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाची सुरुवात 'नादरंग' या सांगीतिक कार्यक्रमाने झाली. तालमणी पं. मुकुंदराज देव, रोहित देव, सचिन नाखवा, चिराग कट्टी (सतार), गंधार भालेराव (बासरी) आणि शिवहरी रानडे (कीबोर्ड) यांनी सादर केलेल्या सुरेल वादनाने उपस्थितांची मने जिंकली. मिलिंद कुलकर्णी आणि मृण्मयी भजक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांनी आभार प्रदर्शन केले. 'बंधू'च्या प्रदर्शनाने 'चित्रपताका'ची उत्साहात सुरुवात

महोत्सवाची सुरुवात 'बंधू' या चित्रपटाच्या प्रदर्शनाने करण्यात आली. उपेंद्र लिमये व जितेंद्र जोशी यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट दोन भावांमधील नातेसंबंध, प्रेम, संघर्ष, जिव्हाळा आणि त्याग यांची भावस्पर्शी कथा मांडतो. अद्याप अप्रदर्शित असलेल्या या सिनेमाचा आस्वाद घेण्याची संधी प्रेक्षकांना महोत्सवाच्या उद्घाटकीय सिनेमाच्या माध्यमातून यावेळी मिळाली. उद्घाटन सोहळ्यात 'बंधू' या उद्घाटकीय चित्रपटातील कलावंतांचा विशेष सन्मान करण्यात आला. मराठी चित्रपटसृष्टीतील वैविध्यपूर्ण आशय, सर्जनशीलता आणि कलात्मक प्रयोगांचा उत्सव असलेला 'चित्रपताका-२०२६' हा महोत्सव १८ नोव्हेंबरपर्यंत रंगणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

पान ४ वरून

रिपब्लिकन सेनेचा

उद्देशाने सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी २१ नोव्हेंबर १९९८ रोजी रिपब्लिकन सेनेची स्थापना केली. गेल्या २७ वर्षांपासून संघटना सामाजिक न्याय, वंचितांचे हक्क आणि आंबेडकरी विचारांचा प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. या वर्धापन दिन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशीलकुमार सूर्यवंशी राहणार आहेत. यावेळी राष्ट्रीय महासचिव संजीव बोंधनकर, केंद्रीय कोषाध्यक्ष आकाश कांबळे, केंद्रीय सदस्य प्रा. जगन्नाथ बाबा, प्रा. युवराज धसवाडीकर, प्रदेश उपाध्यक्ष यशवंत भालेराव, किरण घोंगडे, प्रदेश महासचिव विनोद काळे, सोमनाथ भोसले यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

ढक्का परिवाराची सामाजिक

नगरसेवक महावीर ढक्का यांनी आपल्या परिवाराच्या सामाजिक कार्याची माहिती देताना सांगितले की, आतापर्यंत धक्का परिवाराच्या वतीने २४ मंदिरांचे बांधकाम करण्यात आले असून, भविष्यात आणखी २० मंदिरांचे बांधकाम करण्याचा संकल्प आहे. मस्तगड परिसरातही सामाजिक बांधिलकी जपत, काही घरांचा अपवाद वगळता परिसरातील गरजू कुटुंबांमधील मुलींच्या लग्नासाठी वधूला १० ते २० हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत केली जाते. कोरोना महामारीच्या कठीण काळातही ढक्का परिवाराने नागरिकांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला होता. लॉकडाऊनच्या काळात चार टप्प्यांत सुमारे ३५ लाख रुपयांचे किराणा किट नागरिकांना वितरित करण्यात आले. तसेच कोरोनाच्या काळात आपल्या मुलाचा वाढदिवस साजरा न करता त्या खर्चातून गांधी नगर स्मशानभूमीसाठी चितेसाठी चार टन लाकडांची व्यवस्था करण्यात आली. याशिवाय पाच हजार मास्कचे वाटप करण्यात आले, तर सिव्हिल हॉस्पिटल आणि महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पीपीई किटचे वितरण करण्यात आल्याची माहिती महावीर ढक्का यांनी दिली. राजकारणासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न! केवळ राजकीय उपक्रमांपुरते मर्यादित न राहता समाजातील गरजू, वंचित आणि दुर्लक्षित घटकांना मदतीचा हात देण्याचा ढक्का परिवाराचा प्रयत्न असल्याचे यावेळी महावीर ढक्का यांनी सांगितले. मागील आठ वर्षापासून महावीर ढक्का परिवाराच्या वतीने स्वखर्चाने मंमादेवी मंदिरासमोर नवरात्र निमित्त भजन चे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात ठेवण्यात येतात गेल्या ३० वर्षांपासून सुरू असलेली सामाजिक कार्याची परंपरा यापुढेही अधिक व्यापक स्वरूपात सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या साडीवाटप उपक्रमामुळे प्रभागातील महिला भगिनींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. दिवाळीच्या सणानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. यावेळी नगरसेवक वीरेंद्र धोका, नगरसेवक किशोर अण्णा गर्दास, नगरसेवक कल्याण भदणेकर, गुरु शोभाताई, रंजीत मगरे, डॉ. पाटील सुरज ढक्का यांच्यासह मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

कष्टकऱ्यांच्या आनंदात

बागल, सचिन बागल, सिद्धेश्वर देवडे, विनोद बागल, गजेंद्र बागल, गणेश देवडे, विश्वंभर देवडे, वैभव देवडे, प्रशांत उबाळे, परमेश्वर देवडे, चैतन्य देवडे, राजू देवडे, रामनाथ देवडे, नवनाथ सिरसाठ, भाऊसाहेब गोल्डे, रवी जगधने, बाबुराव बागल, सुभाष बागल यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.काशिफ यांचा

शहरातल्या अनेक मान्यवर व्यक्ती उपस्थित होते. यामध्ये मा. इक्बाल पाशा, तय्यब बापू देशमुख (शहर उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – श.प.), समाजसेवक अतीक खान, यजमानपद भूषवणारे समाजसेवक बदर चाऊस, नगरसेवक अन्वर मिर्झा, फिरोज अली, अब्दुल मुजीब, कलीम खान, जिया भाई यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खेड्यापाड्यातील दारात

अंतर्गत हा क्रांतिकारी प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यात आला आहे. यासाठी तब्बल ४ कोटी ९९ लाख रुपयांचा मोठा निधी खर्च करून फिरते रुग्णालय सुरू करण्यात आले आहे. या फिरत्या रुग्णालयामध्ये अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे आणि तज्ज्ञ कर्मचाऱ्यांची फौज असणार आहे. हे रुग्णालय एका निश्चित वेळापत्रकानुसार दुर्गम गावांमध्ये जाऊन नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार, आवश्यक वैद्यकीय चाचण्या आणि थेट औषधवाटप करणार आहे. विशेषतः माता व बाल आरोग्य, कुपोषण, हिवताप आणि क्षयरोग (ढड) यांसारख्या गंभीर आजारांचे लवकर निदान करून वेळीच योग्य उपचार देण्यावर या मोहिमेत विशेष भर दिला जाणार आहे. जर एखाद्या रुग्णाची प्रकृती अधिक गंभीर असेल, तर त्याला तातडीने नजीकच्या मोठ्या रुग्णालयात हलवण्यासाठीही यंत्रणा सज्ज ठेवली आहे. फक्त फिरते रुग्णालयच नव्हे, तर दुर्गम भागात २४ तास आपत्कालीन सेवा देण्यासाठी वैद्यकीय अधिकारी व निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांसह सुसज्ज रुग्णवाहिका सेवेसाठी अतिरिक्त १ कोटी ६३ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. अशा प्रकारे या संपूर्ण आरोग्य प्रकल्पासाठी तब्बल ६ कोटी ६२ लाख रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे गडचिरोलीच्या खनिज बाधित क्षेत्रातील आरोग्य यंत्रणेचा कायापालट होणार आहे. गेल्या अनेक दशकांपासून दळणवळणाच्या आणि आरोग्याच्या सुविधांपासून वंचित असलेल्या गडचिरोलीतील आदिवासी बांधवांसाठी हा प्रकल्प खऱ्या अर्थाने वरदान ठरणार असून, उपचारासाठी होणारा खर्च आणि वेळ यामुळे मोठ्या प्रमाणावर वाचणार आहे.

भोकरदनला प्रतीक्षा तुकाराम मुंढें

का, याची तपासणी होणे आवश्यक आहे अन्न भेसळ हा नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित गंभीर विषय आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने या परिसरातील गोदामांची तपासणी करून नमुने घेणे, परवाने तपासणे आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन नेमके करतंय काय? भोकरदन शहरात प्रतिबंधित गुटख्याचा कथित व्यवसाय सुरू असल्याच्या चर्चा वारंवार समोर येत असताना संबंधित यंत्रणांची भूमिका काय आहे, हा सर्वसामान्य नागरिकांचा प्रश्न आहे. पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करावी. संशयित गोदामातील मालाची तपासणी, वाहतुकीची माहिती, संबंधित वाहनांचे दस्तऐवज आणि आर्थिक व्यवहारांची कायदेशीर चौकशी व्हावी. तसेच अन्न व औषध प्रशासनानेही तातडीने तपासणी मोहीम राबवावी. प्रशासनाच्या मौनाबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असली, तरी कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचा सहभाग असल्याचा निष्कर्ष चौकशीपूर्वी काढता येणार नाही. मात्र, संशयित व्यवहारांची निष्पक्ष चौकशी होणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. भोकरदनला तुकाराम मुंढेंसारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची गरज? कायद्याची अंमलबजावणी करताना कोणाचाही मुलाहिजा न ठेवता काम करणारे अधिकारी प्रशासनात असणे ही काळाची गरज आहे. तुकाराम मुंढे यांच्यासारख्या शिस्तप्रिय आणि कर्तव्यकठोर अधिकाऱ्यांची कार्यपद्धती अनेकदा चर्चेत राहिली आहे. त्याच धर्तीवर भोकरदनमध्येही अवैध व्यवसायांविरोधात निर्भीडपणे कारवाई करणारी यंत्रणा उभी राहावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. शहरातील सामान्य नागरिकांना कायद्याचे नियम पाळण्यास सांगितले जाते; मग मोठ्या आर्थिक उलाढालीच्या संशयास्पद व्यवहारांवरही तितक्याच कठोरपणे कारवाई होणार का? कायदा सर्वांसाठी समान असेल, तर प्रतिबंधित गुटख्याच्या कथित साठवणुकीची निष्पक्ष चौकशी करण्यास प्रशासन मागे का राहावे? जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे! भोकरदनमधील या कथित प्रकरणाची गंभीर दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी पोलीस विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाला संयुक्त तपासणीचे निर्देश द्यावेत, अशी मागणी पुढे येत आहे. म्हाडा कॉलनी परिसरातील संबंधित गोदामाची तपासणी करून तेथे काय साठवले जाते, कंटेनरमधून नेमका कोणता माल आणला जातो, संबंधित व्यवसायाकडे आवश्यक परवाने आहेत का आणि प्रतिबंधित गुटख्याची विक्री किंवा साठवणूक होत आहे का, याचा तपास व्हावा. दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. आता प्रश्न एकच आहे – भोकरदनमधील कथित गुटखा व्यवसायाच्या मुळापर्यंत प्रशासन पोहोचणार का? म्हाडा कॉलनीतील गोदामाची चौकशी होणार का? की या प्रकरणाची चर्चा काही दिवसांनी शांत होऊन पुन्हा अवैध व्यवसायाला मोकळे रान मिळणार? भोकरदनकरांना आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष कारवाईची प्रतीक्षा आहे. आता तरी प्रशासनाने जागे व्हावे आणि कायद्याचा धाक निर्माण करावा, हीच नागरिकांची अपेक्षा!

लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ ४ दिवसांच्या दौऱ्यावर

नवी दिल्ली : भारत आणि चेक प्रजासत्ताक यांच्यातील द्विपक्षीय संरक्षण सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने भारतीय लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ १६ ते १९ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत चेक प्रजासत्ताकाच्या अधिकृत दौऱ्यावर रवाना होत आहेत. या दौऱ्यात दोन्ही देशांमधील लष्करी संबंध दृढ करणे, संरक्षण तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि संरक्षण उद्योग क्षेत्रातील सहकार्याच्या नव्या संधी शोधण्यावर भर दिला जाणार आहे. या दौऱ्यादरम्यान जनरल धीरज सेठ प्राग येथील जनरल स्टाफ मुख्यालयात चेक सशस्त्र दलांचे वरिष्ठ लष्करी अधिकारी, जनरल स्टाफ प्रमुख लेफ्टनंट जनरल पेट्र चेपेलका आणि संरक्षण उपप्रमुख यांची भेट घेणार आहेत. यावेळी दोन्ही देशांमधील लष्करी सहकार्य, प्रशिक्षण, सैन्याचे आधुनिकीकरण आणि उदयोन्मुख सुरक्षा आव्हाने यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. याशिवाय, जनरल धीरज सेठ चेक लष्कराच्या शहीद जवानांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहणार आहेत. तसेच चेक प्रजासत्ताकच्या संरक्षण मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही ते भेट घेणार आहेत. या दौऱ्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून लष्करप्रमुख ब्रनो येथील संरक्षण विद्यापीठाला भेट देणार आहेत. तसेच नाटोच्या संयुक्त रासायनिक, जैविक, किरणोत्सर्गी आणि आण्विक संरक्षण उत्कृष्टता केंद्रालाही भेट देऊन चेक सशस्त्र दलांचे विशेष प्रशिक्षण, परिचालन क्षमता आणि भविष्यातील संरक्षण सज्जतेची माहिती घेणार आहेत. संरक्षण उद्योग क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यासाठी जनरल धीरज सेठ –चजड, संरक्षण आणि सुरक्षा उद्योग संघटना तसेच प्रमुख संरक्षण उत्पादकांच्या प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत. या चर्चेत संरक्षण तंत्रज्ञान, आधुनिक लष्करी उपकरणे आणि औद्योगिक भागीदारीच्या संधींचा आढावा घेतला जाणार आहे. भारत आणि चेक प्रजासत्ताक यांच्यातील दीर्घकालीन लष्करी संवाद, व्यावसायिक देवाणघेवाण आणि औद्योगिक सहकार्य अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

'पंचायत'च्या पाचव्या सीझनच्या रिलीजबद्दल

मुंबई: ओटीटीप्रेमी गेल्या अनेक वर्षभरापासून 'पंचायत' वेबसीरिजच्या पाचव्या सीझनची आतुरतेने वाट पाहत होते, त्यांना २०२७ पर्यंत वाट पाहावी लागणार आहे. 'पंचायत'वेबसीरिजचा पाचवा सीझन २०२६ या वर्षाच्या शेवटी रिलीज होणार अशी चर्चा होत असताना, अखेर निर्मात्यांकडून चाहत्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. बहुप्रतिक्षित 'पंचायत' वेबसीरिजचा पाचवा सीझन २०२६ मध्ये रिलीज होणार नाही. चाहत्यांना २०२७ पर्यंत वाट पाहावी लागणार आहे. काही तासांपूर्वीच 'पंचायत'च्या मेकर्सने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत चाहत्यांना ही महत्त्वाची अपडेट दिली आहे. ह्या अपडेटमुळे 'पंचायत' वेबसीरिजचे चाहते नक्कीच नाराज झाले आहेत. प्राईम व्हिडिओने काही तासांपूर्वी एक फोटो शेअर केलेला आहे.



या फोटोवर निर्मात्यांनी लिहिले की, २०२६ या वर्षी 'पंचायत'चा पाचवा सीझन रिलीज होणार नाही, असं लिहिलं आहे. ही पोस्ट शेअर करताना कॅप्शन दिले की, दुर्दैवाने, 'पंचायत'चा आगामी सीझन अजुनही पुर्णपणे गुपित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मेकर्सच्या ह्या निर्णयामुळे चाहत्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. पंचायत वेबसीरिजमधील कॅरेक्टरच्या शैलीमध्ये चाहत्यांकडून विरोध केला जात आहे. या बहुप्रतिक्षित वेबसीरिजचा पुढचा सीझन २०२७ मध्ये केव्हा रिलीज होणार याची चाहत्यांमध्ये उत्सुकता पाहायला मिळत आहे. लॉकडाऊनच्या काळामध्ये प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन प्राईम व्हिडिओवरील, 'पंचायत'वेबसीरिजने केलं आहे. 'पंचायत' वेबसीरिजचे आतापर्यंत चार सीझन रिलीज झाले आहेत. या सीरिजचा शेवटचा एपिसोड जून २०२५ मध्ये रिलीज झाला होता. एक वर्ष झालं असून आता चाहत्यांमध्ये आगामी एपिसोडची चर्चा आहे. येत्या आगामी सीझनमध्ये फुलेरा गावाचा पुढचा प्रधान कोण होणार? सचिव आणि रिंकीची लव्हस्टोरी कोणतं वळण घेते? प्रधानजीचा मुख्य मारेकरी कोण? यासह अनेक अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे चाहत्यांना 'पंचायत'च्या पाचव्या सीझनमध्ये मिळण्याची अपेक्षा आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून चाहत्यांमध्ये या सीरिजबद्दल उत्सुकता कायम आहे. 'पंचायत'च्या पाचव्या सीझनची रिलीज डेट मेकर्स केव्हापर्यंत रिलीज करणार या प्रतिक्षेत सध्या चाहते आहेत.

मुर्खत्व ..

कधीही बनवा मुर्ख
एक एप्रिल कशाला
अंधभक्त संपूर्णतय:
हत्ती म्हणा सशाला

आम्हीश्रोते भाडोत्री
पैसा टाळी हशाला
एक चपटी रात्रीला
गरमी मिळे घशाला

शुभ्र वेशात डॉक्टर्स
काळिमा बा पेशाला
तारखा घेतो वकील
जागा काळे वेशाला

घाबरून सोडे टंचाई
सिलेंडर घेई उशाला
पूर्णकमाई गमावतो
स्वस्तवाटे मधुशाला

मोठमोठे उद्योग पति
सहज फसवे देशाला
आवाज उठवे पागल
कारणबनतो द्वेषाला

एकावर कैकफुक्कट
बळी पडे आमिषाला
स्वस्तबोले महाग घेई
रोजचं चाट खिशाला

शिकविते परिस्थिती
अनुभव खरी प्रशाला
मुर्खत्वात शहाणपणा
मुळी न वाटे ओशाळा

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

शक्य..

आपण होता म्हणून
सगळ झालयं शक्य
अधोरेखित करायचं
हे सुवर्णाक्षरी वाक्य

पूर्णविश्वास स्वतांवर
काही न मग अशक्य
स्वच्छस्पष्ट दिशादर्श
घडवू शकतो मतैक्य

प्रयास योग्य वाटेवरी
सत्यातआणे अतर्क्य
बळदेतो साथीदारास
तेंव्हाच राहे अजिंक्य

घातक अति वैमनस्य
भोवती पसरे अनैक्य
नेता माने एकमतांनी
ज्यांचे मना आधिक्य

विचारहवे चिरतरूण
वागणे स्थीर वार्धक्य
शिकण्यात रमे बाल्य
मिळू शके सर्वाधिक्य

जथा मागे लहानथोर
असावे नक्कीमतैक्य
काही वेगळी वैशिष्ट्ये
नेत्यां असावे पार्थक्य

सर्वां साठी झगडे जो
लक्षात ठेवते त्रैलोक्य
नोंद होईलं इतिहासा
बोल त्याचे महावाक्य

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

अंगिकार..

बहुतांश पक्ष करती
गैरमार्गाचे अंगिकार
नकळत गुन्ह्या पाळे
खोलवर रुजेविकार

मातीत किडे मिसळे
घटाला देता आकार
येन केन प्रकारेण ते
सत्तास्वप्न हो साकार

खेळ हा आकड्यांचा
घडवू आणे चमत्कार
उसनी फुले आणली
स्वताचा करा सत्कार

सोयरिक जुडेकशीही
प्रतिस्पर्ध्यां दे होकार
साधे नवीन गठबंधन
जुन्यानात्यांना नकार

करता रोखी व्यवहार
वाढवून बसला उधार
लंगडी बाजू सवराया
कुबड्यांचा घे आधार

सबळ बहुमत साधायं
कमकुता वरती मदार
कुणाला निवडून दिले
अस्वस्थ होतो मतदार

विचित्र आकडे शास्त्र
मनावर करतातप्रहार
आदरकरे जनमताचा
जीत असो किंवा हार

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

हपापले ..

सत्ते भोवती फिरती
नेते अनेक हपापले
मनांमध्ये रूजवलेले
स्वार्थीहेतु आपापले

अदृश्यजाळे मोहाचे
आसमंतात व्यापले
कट जरी बहिस्थांचा
सामीलहोती आपले

काम यांचे चालू होई
वाटेजेंव्हा सर्व संपले
साध्य करती अंतस्थ
हे वाता वरण तापले

बंद होतीलं चौकशां
लपून बसती गफले
स्वच्छ झाले नेतोबा
डोळ्यां कसे खुपले

सत्तेतमिळवावे वाटा
आयतेसावज टिपले
बसा फुकट पंगतीत
खायला गरम थेपले

जन घालती हेलपाटे
भोके पडलीत चपले
कसे असे राज्यकर्ते
भीड भाड सर्व चेपले

सोयरेसुतक न काही
आत्मे बेभाव विकले
दिलेल्याआश्वासनांस
खुशालरस्त्या फेकले

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

पान १ वरून

युवक हे समाजाच्या परिवर्तनाचे

संघटनेसाठी सकारात्मक बाब आहे असेही या वेळी त्यांनी सांगितले. नव्याने सहभागी झालेल्या युवकांच्या सहभागातून पक्ष संघटनेला अधिक बळकटी मिळेल. परतूर शहराच्या विकासासाठी आणि पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी या युवकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वासही राहुल लोणीकर यांनी व्यक्त केला. या वेळी आकाश काळे, किशोर जाधव, राजू राऊत, विक्रम चव्हाण, योगेश गायकवाड, आदित्य रोहिणकर, किरण आढे, श्याम राऊत, कृष्ण उबाळे, संदीप राऊत, शुभम काळे, आकाश जाधव, शरद चव्हाण, रुद्रा काळे, दीपक शिंदे, राहुल लीबाळकर, राहुल जावळे, सुरेश हरकळ, सुनील चिरमाडे यांच्यासह अनेक युवकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी ज्येष्ठ नेते भगवानराव मोरे ,दया काटे शहाजी राक्षे संदीप दादा बाहेकर प्रवीण सातोनकर प्रकाश चव्हाण सोनू अग्रवाल सावता काळे सतीश सोनोने प्रल्हादराव दवणे कृष्णा आरगडे प्रमोद राठोड दीपक पुरी संभाजी घनवट विजय यादव अर्जुन राठोड आकाश राक्षे संतोष हिवाळे मनोज माटोले मलिक कुरशी रफिक कूरेशी अमोल हरजुळे प्रमोद पिसाळ राम जईद नरेश पवार दत्ता एकीलवाले सोनू डोलारकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यर्त्यांची उपस्थिती होती

दिव्यांगांच्या मानधनात

आले होते. या मागणीला आता आमदार सुहास शिरसाट यांनी पाठिंबा देत मंत्री अतुल सावे यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे. महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आमदार सुहास शिरसाट यांनी दिलेल्या निवेदनात दिव्यांग बांधवांचे मासिक आर्थिक सहाय्य वाढविण्याबरोबरच त्यांच्यासाठी राखीव निधीचा प्रभावी वापर करण्याची मागणी केली आहे. याशिवाय दिव्यांगांना घरकुल सुविधा उपलब्ध करून देणे, स्वयंरोजगारासाठी संधी निर्माण करणे, शिक्षण व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. दिव्यांग बांधवांच्या अडचणी आणि आर्थिक परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून पेन्शन वाढीसह इतर प्रलंबित मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका आमदार शिरसाट यांनी निवेदनातून मांडली आहे. आता आमदारांच्या पाठिंब्यानंतर दिव्यांगांचे मासिक पेन्शन सहा हजार रुपये करण्याच्या मागणीवर राज्य सरकार काय निर्णय घेते, याकडे महाराष्ट्रातील दिव्यांग बांधवांचे लक्ष लागले आहे.

खाजगी कापूस खरेदीचा

संजय छबिलवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या कार्यक्रमास महंत बालयोगी पवनभारती खडेश्वरी बाबांजी (शिवशक्ती आश्रम,तुपेवाडी ता.बदनापूर जि.जालना) यांचे विशेष आशीर्वाद लाभले.तसेच मा.श्री.प्रकाश चव्हाण (सहाय्यक अभियंता,महावितरण) व मा.श्री.बाबुराव राठोड (मा.पंचायत समिती सदस्य,घनसावंगी),हरिश्चंद्र बाबा शिंदे,संतोष मोहिते,सिताराम भोसले, बाबुराव राठोड,वामनराव राठोड,जयप्रकाश चव्हाण,प्रकाश चव्हाण, अनिलराव कोलते,संतोष ढेंगळे,सुधाकर वाडेकर,फिरोज लाला तांबोळी,राम पाटील शिरसाट हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.तसेच यावेळी शेतकरी दिघे पाटील यांनी कापूस विक्रीचा आणला त्यास भाव ९५५१ रुपये देण्यात आला आहे. तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू करण्यात आलेल्या या कापूस खरेदी केंद्राच्या शुभारंभ प्रसंगी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन मोहन कन्हींराम राठोड,कैलास गुलाबराव पा.चव्हाण,विलास गुलाबराव पा.चव्हाण,किशोर गुलाबराव पा.चव्हाण,मयुरेश्वर मोहनराव राठोड,अभिजित कैलासराव चव्हाण तसेच ओमेश कॉर्टेक्स जिनिंग प्रेसिंग,जालना यांच्या परिवारामार्फत आलेल्या सर्व मान्यवरांचे व शेतकऱ्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.

बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याचे

मंदिरासारख्या ठिकाणी केवळ आदिवासी आहे म्हणून तिला बोलावले जात नाही पण गंमत अशी आहे मित्रांनो, नाशिक येथील कुंभमेळ्यात तिला बोलावून संपूर्ण आदिवासी समाजाला एकत्र केले जाते. अशा कार्यक्रमातून आदिवासी संस्कृती संपवण्याचे षडयंत्र देशात सुरू आहेत, आदिवासींच्या नावाने फायदे घेण्यापेक्षा देशातील विकासाचे महत्वाचे धागे झाले पाहिजेत, मा .आ. कैलास शेठ गोरंट्याल, म्हणाले की मी सातत्याने आदिवासी समाजाच्या सोबत राहणार आहे , त्यांनी आवाज द्यावा कधीही वेळप्रसंगी मदत करण्यास तयार आहे,शिवलाल अक्षय यांचीही मनोगत झाले, बाबासाहेब वानखेडे , शिवप्रकाश चितळकर, यांनीही यावेळी शुभेच्छा दिल्या. माणिक तोटे, चंद्रकांत रत्नपारखे, गंगाराम आढाव, अंगद कापरे, किशोर स्वामी, बन्सीदास भगुरे, रजनीकांत बंडालू, ओम कायंदे, गणेश बेनीवाल कैलास रसाळ शिवलाल वडोदे, संतोष लामकाने, गयाबाई साळवे, रेखा षडमलू, शिवकन्या षडमलू, करुणा साळवे, प्रगती षडमलू, प्रशंशा षडमलू , शैलेश लिंबेकर, इत्यादीसह अनेक कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता, यावेळी कार्यक्रमासाठी आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात सहभागी झाला होता. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक , आभार प्रदर्शन गोकुळ स्वामी यांनी केले.

बालहक्क समाहाला उत्साहात

गाव नकाशाच्या माध्यमातून सादरीकरण असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत. खेळ, चित्रपट प्रदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून बालहक्क कायदे, बालमजुरी प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, बालसुरक्षा व शिक्षणाचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. प्रत्येक गावात प्रभातफेरी, मशाल फेरी आणि विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. ऊसतोड कामगारांच्या हंगामी स्थलांतरामुळे गावात मागे राहणाऱ्या मुलांच्या शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि संगोपनाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी 'हंगामी स्थलांतरित कुटुंबस्तर अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत गावागावांत प्रभातफेरी, स्थलांतरित कुटुंबांच्या भेटी आणि बालकांशी संवाद साधून जनजागृती केली जात आहे. जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये सरपंच, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, गावातील प्रेरक–प्रेरिका आणि बालमित्र यांच्या सहभागातून मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गावपातळीवर बालकांचे प्रश्न समजून घेऊन त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी सामूहिक प्रयत्न केले जाणार आहेत.

भगवान बिरसा मुंडा यांचे

प्रियंका मुकिंदा साबळे, भागुबाई अशोक कोकाटे, जयश्री मुकिंदा साबळे, यांनी भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केला या वेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्यासह भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले दया काटे शामराव महाराज काळे संदीप बाहेकर शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर प्रकाश चव्हाण शहाजी राक्षे सोनू अग्रवाल सावता काळे सतीश सोनवणे कृष्णा आरगडे दीपक पुरी संभाजी घनवट विजय यादव दीपक कुरे शहा नावाज कुरेशी आकाश राक्षे संतोष हिवाळे मनोज माटोले मलिक कुरेशी रफिक कुरेशी अमोल हरजुळे काळे सर गणेश ठाकूर गाढवे सर प्रमोद डोळझाके यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

रिपब्लिकन सेनेचा २८ वा वर्धापन दिन सोहळा जालन्यात उत्साहात होणार!

जालना : रिपब्लिकन सेनेचा २८ वा वर्धापन दिन सोहळा शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६ रोजी जालना शहरातील गोल्डी लॉन्स येथे दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या भव्य सोहळ्याचे उद्घाटन रिपब्लिकन सेनेचे संस्थापक सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते होणार असून, रिपब्लिकन युवा सेनेचे युवा नेते ॲड. अमन आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाची माहिती रिपब्लिकन सेनेच्या वतीने जालना येथील हॉटेल सात्विक येथे आयोजित पत्रकार परिषदेत रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रा.डॉ. सुशिलकुमार सूर्यवंशी यांच्यावतीने देण्यात आली.



देशभरातून पाच हजार कार्यकर्ते उपस्थित राहणार

या वर्धापन दिन सोहळ्यास महाराष्ट्रासह देशभरातून सुमारे पाच हजार पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. त्यामुळे जालन्यात रिपब्लिकन सेनेचा हा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात पार पडणार आहे. या कार्यक्रमास रिपब्लिकन सेनेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आंबेडकरी विचारांच्या अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा युवा अध्यक्ष दिनेश आढमाने, माजी जिल्हाध्यक्ष लिंबाजी वाहुळकर तसेच जिल्ह्यातील नेते सतीश वाहुळे, आणि जितेंद्र उघडे यांनी केले आहे.

वर्धापन दिनानिमित्त महत्त्वाच्या प्रश्नांवर धोरणात्मक चर्चा

या सोहळ्यानिमित्त विशेष सभेचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये राज्यातील विविध ज्वलंत सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय प्रश्नांवर चर्चा होणार आहे. गायरान जमिनी प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकरी व भूमिहीनांच्या नावे करण्यात याव्यात, अशी ठोस भूमिका मांडण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थिती, त्यावरील उपाययोजना, वेगाने होत असलेला पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्यावर प्रभावी उपाय याबाबत सविस्तर चर्चा केली जाणार आहे. याशिवाय विविध आर्थिक विकास महामंडळांमार्फत देण्यात आलेली बँक कर्जे, मायक्रो फायनान्स कंपन्यांची कर्जे तसेच बचत गटांची कर्जे सरसकट माफ करण्यात यावीत, असा ठराव या सभेत संमत करण्यात येणार आहे. सामाजिक उपवर्गीकरणाच्या विषयावरही यावेळी भूमिका मांडली जाणार आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांवर आधारित आणि उपेक्षित, वंचित घटकांचे प्रश्न सोडविण्याच्या (पान ३ वर)

ऊसतोड कामगारांसोबत शिवसेनेची दिवाळी; दिवाळीच्या शिध्याचे वाटप!



जाफराबाद, जि. जालना : राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि ऊसतोड कामगार आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. या पार्श्वभूमीवर गरजू कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी, या सामाजिक भावनेतून शिवसेनेच्या वतीने जाफराबाद तालुक्यातील डोलखेडा खुर्द येथे ऊसतोड कामगारांना आनंदाच्या शिध्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते ऊसतोड कामगारांना दिवाळी शिध्याचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी भाऊसाहेब घुगे यांनी स्वतः कामगारांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. दुष्काळामुळे शेतकरी, शेतमजूर आणि कामगार वर्गाच्या हाताला काम मिळणे कठीण झाले असून अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. अशा संकटाच्या काळात कष्टकरी वर्गाने खचून जाऊ नये, त्यांच्या पाठीशी शिवसेना खंबीरपणे उभी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. शेतकरी आणि कष्टकरी बांधवांच्या सुख-दुःखात प्रत्यक्ष सहभागी होणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि गरजेच्या वेळी मदतीचा हात देणे हीच सामाजिक बांधिलकी आहे, अशी भूमिका भाऊसाहेब घुगे यांनी यावेळी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेच्या माध्यमातून नैसर्गिक आपत्तीच्या प्रत्येक प्रसंगी गरजूंना मदत करण्यात येत आहे. ऊसतोड कामगारांच्या कुटुंबीयांनाही दिवाळीचा आनंद घेता यावा, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे ऊसतोड कामगारांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलला. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके, तालुकाप्रमुख दत्ता बंगाळे, राजू परिहार, परमेश्वर मोरे, शिवाजी डोईफोडे, सरपंच मनीषा गजानन डोईफोडे, अशोक पंढरीनाथ डोईफोडे, समाधान डोईफोडे, गणेश डोईफोडे, सुभाष डोईफोडे, श्रीराम डोईफोडे, गणराज वाघ, तुळशीराम डोईफोडे यांच्यासह शिवसैनिक आणि ऊसतोड कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संकटात शेतकरी-कष्टकऱ्यांच्या पाठीशी शिवसेना!

दुष्काळाच्या संकटात शेतकरी, शेतमजूर आणि ऊसतोड कामगार आर्थिक अडचणीत आहेत. अशा वेळी केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष मदतीसाठी पुढे येणे गरजेचे आहे. डोलखेडा खुर्द येथे ऊसतोड कामगारांना आनंदाचा शिधा वाटप करून त्यांच्या दिवाळीत आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कष्टकरी बांधवांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच माझी भूमिका आहे.

भाऊसाहेब घुगे
शिवसेना जिल्हाप्रमुख, जालना

कष्टकऱ्यांच्या आनंदात सहभागी होणे, हीच दिवाळीची गोडी : भास्कर दानवे

जालना प्रतिनिधी :
जालना (प्रतिनिधी) : भारतीय जनता पार्टी जालना महानगर च्या पदाधिकाऱ्यांनी (दि.०७) रोजी मौजे बठान बु. ता.जालना येथे ऊसतोड कामगारांसोबत पालावरची दिवाळी हा उपक्रम राबविण्यात आला. यानिमित्ताने परिसरातील कामगारांना दिवाळीच्या शुभेच्छा देत भेटवस्तू तसेच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या गृहउपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित कामगारांशी संवाद साधला. समाजातील कष्टकरी आणि श्रमिक घटक हा आपल्या सामाजिक व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, अशी भावना यावेळी व्यक्त केली. यावेळी भास्कर आबा दानवे म्हणाले की कष्टावर अनेकांचे जीवनमान अवलंबून आहे. दिवाळी हा आनंद, आपुलकी आणि माणुसकी जपण्याचा सण आहे. कुटुंबापासून दूर राहून कष्ट करणाऱ्या या कामगारांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेता यावा, त्यांच्याही चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने भारतीय जनता पार्टी च्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात पालावरची दिवाळी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजातील



प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात व गरजूंच्या मदतीसाठी तत्पर राहणे हेच आपल्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरगे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केळकर, गटनेते महेश निकम, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंद भताने, सरपंच ज्ञानेश्वर देवडे, दत्तू नाना बागल, नानासाहेब देवडे, बळीराम शिंदे, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, राजाराम जाधव, गजानन खरात, विष्णू डोंगरे, कृष्णा गायके, शिवाजी गवारे, मदन गवारे, डॉ. राहुल मोरे, नागेश अंभोरे, दिगांबर गोल्डे, कुंडलिक जिजा देवडे, दिगंबर गोल्डे, उद्धव ढवळे, विष्णू ढगे, सागर वाहूळकर, सुधाकर शिंदेगणेश बागल, कडूबा जिजा देवडे, विठ्ठल पान ३ वर

ढक्का परिवाराची सामाजिक बांधिलकी; दिवाळीनिमित्त प्रभाग क्रमांक ९ मध्ये साडीवाटप!..


जालना : दिवाळी सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या सामाजिक भावनेतून भाजपचे नगरसेवक महावीर ढक्का व नगरसेवक विक्रांत ढक्का यांच्या वतीने प्रभाग क्रमांक ९ मध्ये साडीवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी तृतीयपंथीय, दिव्यांग महिला, महानगरपालिका महिला कर्मचारी तसेच लाडक्या बहिणींना साड्यांचे वाटप करून दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यात आला.
यावेळी बोलताना महावीर ढक्का यांनी दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधले. दिव्यांगांना आजही अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांना आवश्यक सहकार्य करण्यासाठी ढक्का परिवार सदैव तत्पर राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. केवळ सणापुरते मदतीचे उपक्रम न राबवता समाजातील वंचित आणि गरजू घटकांना सन्मानाने जगता यावे, यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. ढक्का परिवाराच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी



कौतुक केले. भाजप नेते तथा माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या नेतृत्वाखाली महापौर वंदना मगरे यांच्या हस्ते हा साडीवाटप कार्यक्रम पार पडला.
धक्का परिवाराच्या वतीने प्रभाग क्रमांक ९ मध्ये गेल्या ३० वर्षांपासून साडीवाटपाचा सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. भाजप नेते कैलास गोरंट्याल यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच नगरसेवक महावीर ढक्का यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी साडीवाटप आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. ही परंपरा यंदाही दिवाळीच्या निमित्ताने कायम ठेवण्यात आली. यावेळी (पान ३ वर)

डॉ. काशिफ अब्दुल मुजीब यांचा मुस्लिम समाजाच्या वतीने गौरव!

जालना/प्रतिनिधी : जामात-ए-इस्लामी हिंदचे प्रदेश सरचिटणीस मा. अब्दुल मुजीब यांचे चिरंजीव डॉ. काशिफ अब्दुल मुजीब यांनी 'एफएमजीई' (ऋचऋए) परीक्षेत उत्कृष्ट गुणांसह यश संपादन केल्याबद्दल, त्यांचा मुस्लिम समाजाच्या वतीने कचेरी रोड, जुना जालना येथील समाजसेवक मा. बदर चाऊस यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थितांनी डॉ. काशिफ यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.



यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी, खऱ्या अर्थाने जी मजा शिक्षणात आहे, ती इतर कोणत्याच क्षेत्रात नाही. युवकांनी उच्च शिक्षण घेऊन स्वतःची आणि समाजाची उन्नती साधली पाहिजे, असा मोलाचा संदेश दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) जालना शहर उपाध्यक्ष तथा तय्यब बापू देशमुख यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, डॉ. काशिफ अब्दुल मुजीब हे आपले जालना महानगरातील सुपुत्र असल्याने, त्यांनी जालन्यातच राहून सर्वसामान्यांची सेवा करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.
या सत्कार सोहळ्यास (पान ३ वर)

खेड्यापाड्यातील दारात आता आरोग्यसेवा



मुंबई: गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम आणि आदिवासीबहुल भागातील नागरिकांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे. आता डोंगराळ आणि वाडी- वस्त्यांवर राहणाऱ्या आदिवासी बांधवांना उपचारासाठी मैलोनमैल लांब प्रवास करण्याची गरज उरलेली नाही. कारण, थेट त्यांच्या गावातच आधुनिक आरोग्य सुविधा पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज बहुप्रतिक्षित 'हॉस्पिटल ऑन व्हील्स' (फिरते रुग्णालय) प्रकल्पाचे शानदार उद्घाटन करण्यात आले आहे. भौगोलिक अडचणी आणि विशेषतः पावसाळ्याच्या दिवसांत दळणवळण ठप्प झाल्यामुळे अनेक गावांमध्ये आरोग्य सुविधा पोहोचवणे अत्यंत कठीण जात होते. वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे अनेकदा नागरिकांचे प्राण धोक्यात येत असत. हीच गंभीर समस्या ओळखून जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण (पान ३ वर)

प्रल्हाद वाघ यांचे निधन



भोकरदन/ प्रतिनिधी : तालुक्यातील तळणी येथील ज्येष्ठ नागरिक प्रल्हाद दौलत वाघ (वय ६८) यांचे शुक्रवारी (दि. १३) रात्री १० वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्या निधन झाले.
त्यांच्या पार्थिवावर शनिवारी (दि. १४) सकाळी १० वाजता तळणी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.
त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते तळणी येथील प्रगतशील शेतकरी अनिल वाघ यांचे वडील होत.

भोकरदनला प्रतीक्षा तुकाराम मुंढेंसारख्या धडाकेबाज अधिकाऱ्याची; गुटखा माफियांच्या साम्राज्याला सुरुंग लागणार का?

म्हाडा कॉलनीतील गोदामात कंटेनर उतरवून अन्न भेसळीचा खेळ; पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाच्या अर्थपूर्ण मौनावर जिल्ह्याभरात संताप!

भोकरदन शहरात अवैध गुटखा विक्री आणि साठवणुकीचा कथित काळा बाजार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. राज्यात गुटखा विक्री, साठवणूक आणि वाहतुकीवर बंदी असतानाही भोकरदन शहरात गुटखा माफियांचे जाळे सक्रिय असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. शहरातील म्हाडा कॉलनी परिसरातील एका कथित गुटखा व्यावसायिकाच्या गोदामात रात्रीच्या अंधारात मोठमोठे कंटेनर उतरवले जात असल्याची माहिती आणि आरोप समोर येत असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.
विशेष म्हणजे, या गोदामात नेमका कोणता माल येतो? कंटेनरमधून उतरवला जाणारा माल कुठून येतो? त्याची वाहतूक कोणाच्या माध्यमातून केली जाते? तसेच या मालाची साठवणूक आणि वितरण कोणत्या भागात केले जाते? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या संपूर्ण व्यवहाराची अधिकृत यंत्रणांकडून सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. म्हाडा कॉलनी परिसरातील कथित गोदामात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर माल उतरवला जात असल्याची चर्चा आहे. या हालचालींमागे नेमका कोणता व्यवसाय सुरू आहे, याची सत्यता तपासणे आवश्यक आहे. जर या ठिकाणी प्रतिबंधित गुटख्याचा साठा केला जात असेल, तर त्याची माहिती संबंधित विभागांना का मिळत नाही? मिळत असेल तर अद्याप ठोस कारवाई का झालेली नाही?
या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने जनतेसमोर मांडणे गरजेचे आहे. केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करून मोठ्या पुरवठादारांना अभय मिळत असेल, तर अशा कारवाईचा उपयोग काय? अवैध व्यवसायाच्या मुळाशी जाण्याऐवजी केवळ वरवरची कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. गुटख्यापुरताच विषय मर्यादित नाही; अन्न भेसळीचाही संशय!
या प्रकरणात केवळ प्रतिबंधित गुटख्याच्या साठवणुकीचाच मुद्दा नसून, अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. संबंधित गोदामात कोणत्या प्रकारच्या वस्तूंची साठवणूक केली जाते, त्या वस्तूंची गुणवत्ता तपासली जाते का आणि त्यासाठी आवश्यक परवाने आहेत (पान ३ वर)



माझे कोणी काही वाकडे करू शकत नाही! माफियांची मग्रुरी

या गुटखा माफियाला एका बड्या राजकीय नेत्याचा वरदहस्त असल्यानेच प्रशासन हतबल झाल्याची जोरदार कुजबूज शहरात आहे. या राजकीय पाठबळाच्या जोरावर संबंधित माफिया उघडपणे, माझे कोणी काही वाकडे करू शकत नाही, वरपर्यंत माझे हात पोहोचले आहेत, अशी मग्रुरीची भाषा वापरत असल्याचे बोलले जात आहे. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या माफियाची ही मग्रुरी मोडून काढत, त्याच्यामागे असलेल्या 'आका'चा शोध घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

छोट्यांवर कारवाईचा फार्स, बड्या माफियांना 'अभय'!

पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाकडून शहरात केवळ दिखाव्यासाठी छोट्या-मोठ्या पानटपऱ्यांवर किरकोळ कारवायांचा फार्स केला जात आहे. मात्र, जे माफिया कंटेनरच्या माध्यमातून जिल्ह्यात विषारी गुटख्याचा पुरवठा करत आहेत आणि कोट्यवधींची माया जमवत आहेत, त्यांच्या गोदामांकडे पाहण्याची हिंमतही प्रशासन दाखवत नाही. तरुण पिढीचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या मुख्य सूत्रधारांवर कारवाई होणार की प्रशासन केवळ 'बघ्याची' भूमिका घेणार? असा संतापजनक प्रश्न सुज्ञ नागरिक उपस्थित करत आहेत.

जिल्हाभरात चर्चा: बड्या माफियांवर कारवाईचा बडगा उगारणार का?

तुकाराम मुंढे यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याने ज्याप्रमाणे नियमबाह्य कामांना चाप लावला, तसाच धडाका भोकरदनमधील या गुटखा आणि अन्न भेसळ माफियांच्या विरोधात दाखवला जाईल का, याकडे संपूर्ण जालना जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. म्हाडा कॉलनीतील गोदामाची तातडीने झाडाझडती घेऊन मुख्य सूत्रधारांना बेड्या ठोकाव्यात, अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा भोकरदनकरांनी दिला आहे.

अन्न भेसळ आणि प्रशासनाची जबाबदारी

सध्या शहरात विकल्या जाणाऱ्या गुटख्यामध्ये अत्यंत घातक रसायने आणि निकृष्ट दर्जाच्या पदार्थांची भेसळ केली जात असल्याची भीती व्यक्त होत आहे. अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी नेमके करतात काय? म्हाडा कॉलनीतील गोदामावर छापा टाकून या भेसळयुक्त साठ्याचा पर्दाफाश का केला जात नाही? असे प्रश्न आता जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना विचारले जात आहेत.

प्रल्हाद वाघ यांचे निधन

भोकरदन/ प्रतिनिधी : तालुक्यातील तळणी येथील ज्येष्ठ नागरिक प्रल्हाद दौलत वाघ (वय ६८) यांचे शुक्रवारी (दि. १३) रात्री १० वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्या निधन झाले.
त्यांच्या पार्थिवावर शनिवारी (दि. १४) सकाळी १० वाजता तळणी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.
त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते तळणी येथील प्रगतशील शेतकरी अनिल वाघ यांचे वडील होत.